# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र. १८६** **दिनांक १०/०७/२०२१**

## वेश्या व्यवसायावर कारवाई करुन ०२ पिडित मुलींची केली सुटका - अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांची कामगीरी.

दिनांक ९/७/२०२१ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वपोनि. श्री एस. एस. पाटील यांना गोपनीय माहिती मिळाली की, वेश्यादलाल श्रीमती काजल ही पुरुष गिऱ्हाईकांकडुन पैसे स्विकारुन पुरुष ग्राहकांना वेश्यागमनाकरीता मुली पुरवित असून मिरारोड रेल्वे स्टेशन समोरील इशा वाईन शॉपचे जवळील ॲक्सीस बॅक एटीएम सेंटर मिरारोड पूर्व या ठिकाणी वेश्यागमनाकरीता पुरुष गिऱ्हाईकांना मुली पुरविणार आहे. मिळालेल्या बातमीवरुन वपोनि. श्री पाटील यांनी पथकासह नमुद ठिकाणी बोगस गिऱ्हाईक व पंच यांना पाठवुन सत्यता पडताळुन छापा टाकला असता, महिला वेश्या दलाल सुलता उर्फ काजल शक्ती तराफदार वय ३६ वर्ष रा. ०१/०३, गल्ली नं.०१, विक्रोळी पार्क साईड, विक्रोली पश्चिम मुंबई क्र. ७९ मुळ रा. सिमुलपूर हूडा, ठाकूमागर, उत्तर चोवीस परगाना, पश्चिम बंगाल, कोलकत्ता ही वेश्यागमनासाठी ग्राहकांकडुन पैसे स्वीकारुन मुली पुरवित असतांना मिळुन आल्याने तीला वेश्यगमनाकरीता स्विकारलेल्या रक्कमेसह ताब्यात घेवुन ०२ मुलींची सुटका करण्यात आली आहे. महिला वेश्यादलाल हिचे विरुध्द नयानगर पोलीस ठाणे येथे पो.हवा./२२६९ उमेश पाटील यांनी सरकार तर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन नयानगर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ३८५/२०२१ भा.द.वि.सं. कलम ३७०,३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४, ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उप.आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर विभागाचे व.पो.नि. श्री. एस. एस. पाटील, पो.हवा. २२६९ उमेश पाटील, पोहवा.२२९८ विजय निलंगे, पोहवा.१६३ रामचंद्र शिवाजी पाटील, पो.शि. ३६६० केशव शिंदे, मपोना. १७८९ यम्बर, म.पो.ना. २८४५ कमल चव्हाण, चालक पोना. २६३८ गावडे यांनी केली आहे.

-----oooo----